महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, ठाणेशहर
तीन हातनाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–०२२–२५४०१०५६
Email ID –cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र./पोउआ/वा.वि./वा.अ.सुचना/९२८ /२०२४ दिनांकः–२८/०७/२०२४

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका, कार्यक्षेत्रात **कापूरबावडी** वाहतुक उपविभागाचे हद्दीत अॅफकॉन ईन्फ्रास्ट्रक्चर लि.कंपनी कडून मेट्रो क्रं. ५ चे काम करण्यात येणार आहे. सदर मेट्रो ५ चे **पीलर क्रं. पी–१०, पी–११ यावर स्टील गर्डर टाकतेवेळी** घोडबंदर ठाणे वाहीनीवरील कापुरबावडी सर्कल मार्गे ठाण्याचे दिशेने स्लीप रोडवरून व कोलशेत–ढोकाळी कडून कापुरबावडी सर्कलकडे येणारी वाहीनीवरील जड, अवजड व हलकी वाहनांना वाहतुकीस पुर्ण रस्ता बंद करण्यात येणार आहे. सदर मार्गावरील वाहतुक कोंडी होउ नये व परीसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी डॉ.विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १)घोडबंदर ठाणे वाहिनी ब्रॉडवे पेट्राल पंपासमोरील स्लीप रोडवरून कापुरबावडी सर्कल मार्गे ठाणेचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाना आर.मॉल येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही आर.मॉल येथुन डावीकडे वळण घेवुन मनोरमानगर येथुन पुढे सरळ जावून ढोकाळी सिग्नल येथुन उजवीकडे वळण घेवून, नंदीबाबा चौक येथे डावे बाजूस वळण घेवुन कापुरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २)कोलशेत रोडने–ढोकाळी नाक्या कडून कापुरबावडी सर्कल मार्गे ठाणेचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहंनाना नंदिबाबा मंदिर चौक येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही नंदिबाबा मंदिर चौक येथुन डावीकडे वळण घेवुन प्रभाग समिति सिग्नल चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि.२८/०७/२०२४ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि.२९/०७/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत

२) दि.२९/०७/२०२४ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि.३०/०७/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना वर नमुद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने,फायर ब्रिगेट,रूग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर,ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

(डॉ.विनयकुमार मे.राठोड)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग ठाणे शहर

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतूक विभाग.

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.

चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

**प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**

२/— सदरची अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.**

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner